प्रार्थना

सद्‌गुरु देवा, शरण मी आलो । पिडूनिया गेलो, बहु दुःखे ॥ १ ॥

दीन रक्षकांचा, कैवारी असशी । धावोनिया येसी, रक्षी आम्हा ॥ २ ॥

तुजवाचोनिया, नसे आम्हा अन्य । काय घालू आण, तुझी देवा ॥ ३ ॥

जन्मासी येऊनी, पाप ते घडले । दुःख ओढवले धांव आता ॥ ४ ॥

करितो मी धावा, तुझिया नामाचा । आसरा कुणाचा, मज नसे ॥ ५ ॥

सुख आणि दुःख, समसुखे ठेवी । मनी अनुभवी, तूंच माझ्या ॥ ६ ॥

तेव्हा लागे गोडी, तुझिया नामाची । आवडी भक्तीची, जन्मोजन्मी ॥ ७ ॥

हेच सुख माझे, कर्मासी लाभले । भाग्य उदेले, जन्मांतरी ॥ ८ ॥

विश्वनाथ म्हणे, जन्म पराधिन । करावे पावन गुरुराया ॥ ९ ॥